राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

३० वे अधिवेशन

दि. ०९ व १० डिसेंबर २०२२

संपादक
प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे
कार्यकारी संपादक
डॉ. सतीश कदम



ISSN NO. 2231-4342

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

शोध निबंध संग्रह २०२२

Multi-Disciplinary International Research Journal Peer Reviewed

December 2022 Special Issue

प्रमुख संपादक

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर.

कार्यकारी संपादक

डॉ. सतिश कदम

अध्यक्ष

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संपादक मंडळ

डॉ. सोमनाथ रोडे

डॉ. नारायण गवळी

डॉ. शिवराज बोकडे

डॉ. कविता तातेड

शोध निबंध संग्रह २०२२

अनुक्रमणिका

प्राचीन विभाग

अ. क्र.	संशोधक	शोधनिबंधाचे शिर्षक	पृष्ठ क्र.
१.	डॉ. नारायण सूर्यवंशी	लत्तलूर नगरातील सिध्देश्वर व पापविनाश मंदिरातील बारव स्थापत्य : एक अभ्यास	१९
२.	डॉ. संगीता जगन्नाथ पवार	विटा-भाळवणी येथील कन्नड शिलालेख	२४
३.	रोहित राजेंद्र भोसले	कोंढाणे लेणीतील अज्ञात शिलालेख	२८
४.	श्रीनिवास सातभाई	स्थानिक इतिहासलेखनात स्थलनामांच्या अभ्यासाचे महत्त्व	३३
५.	प्रा. डॉ. भीमराव पाटील	सम्राट अशोकाचा शिलालेखांतील संदेश	४०
६.	डॉ. महादेव गव्हाणे	जोर्वे- नेवासे संस्कृतीचा इतिहास	४९
७.	रश्मी (सरला) दिपक भिरूड	सिंधू संस्कृतीच्या लिपीचा उलगडा होण्यास तज्ञांनी केलेले प्रयत्न आणि त्यातील अडथळे	५२
८.	डॉ. विजयसिंग किसनराव पवार	रामटेक ऐतिहासिक किल्ल्याचा आढावा आणि पर्यटकांचा समाधान निर्देशांकाद्वारे अभ्यास	५७
९.	गोधाजी सोपानराव कापसे	राष्ट्रकुट राजवटकालीन धर्मसहिष्णुता	६३
१०.	डॉ. प्रियदर्शनी पाटील	लातूर जिल्ह्यातील गजलक्ष्मी प्रतिमा	६७
११.	डॉ. सुनिलचंद्र सोनकांबळे	भारतातील बौद्ध राजवटींचा संक्षिप्त इतिहास	७१
१२.	डॉ राजाराम पिंपळपल्ले, सरस्वती निवृत्ती सोनाळे	सम्राट अशोकाचे धार्मिक धोरण एक अवलोकन	७४
१३.	प्रा.मनिषा श्रेणिककुमार पाटील	बुध्दांची स्त्रियांविषयीची धारणा आणि गौतमशिष्या आनंद	७९
१४.	प्रा.डॉ.नामदेव एम. हटवार	प्राचीन भारत में व्यवसायिक संघ – एक अध्ययन	८३

५१.	संजीवनी बारहाते	हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामातील महिलंचे योगदान	२७५
५२.	सुनीताबाई भगवान पाटील	भारताच्या जडणघडण मध्ये सामाजिक सुधारणा चळवळीचे योगदान	२७८
५३.	लहू गायकवाड	कोपरगाव तालुक्यातील महिलांचे स्वातंत्र्यचळवळीत योगदान	२८२
५४.	प्रा.डॉ.प्रकाश संभाजी वाघमारे	अवयवदान सर्वश्रेष्ठदान - भाग-०१	२८६
५५.	प्रा.डॉ. सतीश कदम	बारसी लाईट रेल्वे कंपनीचा रोमहर्षक इतिहास	२९२
५६.	डॉ. राजाराम रा पिंपळपल्ले	हिंगोली येथील नाणे संग्रहकांचे इतिहास लेखनात योगदान	२९६
५७.	डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे, श्री रामप्रसाद मोहनराव व्हडगीर	ब्रिटिशकालीन महाराष्ट्रातील आरोग्य सेवेचा विकास (इ.स. १८१८ ते इ.स. १९४७)	३०५
५८.	प्रा.डॉ.अतिश माधवराव कदम	भारतीय स्वातंत्र्य लढ्यात डॉ. पंजाबराव देशमुखांचे योगदान	३११
५९.	प्रा.देविदास गोविंदराव चव्हाण	मराठवाड्यातील शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणाची लक्षणे : एक चिकित्सक अभ्यास	३१५
६०.	प्रा.डॉ.अनंत नामदेवराव शिंदे	भारतातील प्राचीन व आधुनिक काळातील शिक्षणाची पद्धती व शैक्षणिक परिवर्तनाचे तुलनात्मक अध्ययन	३१९
६१.	प्रा.डॉ. बी. जी. माने	हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम व उस्मानाबाद जिल्ह्यातील आर्य समाजाचे कार्य	३२४
६२.	डॉ. बाबासाहेब शेप	महाराष्ट्राचे राजकारण - स्त्रिया एक अभ्यास	३२८
६३.	डॉ. बाळासाहेब आमगोंडा कोटलगी	कोल्हापूर संस्थानातील रस्ते वाहतूकीचे बदलते स्वरूप (१८४५-१९४९)	३३५
६४.	प्रा.डॉ.दिनेश रामदास महाजन	पूर्वखानदेश जिल्हयाचे टिळक स्वराज्य फंडातील योगदान	३४३
६५.	डॉ. गीतांजली भीमराव बोराडे	न्या. नरेंद्र पुरूषोत्तम चपळगावकर एक ऐतिहासिक चिंतन (दि. १० एप्रिल १९३७ ते इ.स. २०२२)	३४७
६६.	डॉ. गणेश गोविंदराव माने	स्वातंत्र्यौत्तर काळातील ओबीसी आरक्षणाचा तिढा आणि जातिनिहाय जनगनना	३५१
६७.	प्रा.डॉ.राजू शिवाजी कोंडेकर	इतिहास संशोधक : सेतु माधवराव पगडी	३५५
६८.	डॉ. संतोष हनुमंत जाधव	बॅरिस्टर पी. जी. पाटील यांचे रयत शिक्षण संस्थेतील कार्य	३६०

६९.	प्रा.डॉ संतोष तुकाराम कदम	फलटण तालुक्यातील शेतीच्या विकासामध्ये कृषी सहकारी सोसायट्यांचे योगदान (सन १९४८ - २०००)	३६९
७०.	प्रा. डॉ. शिवाजी गाढे	आधुनिक विभाग संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि दादासाहेब गायकवाड	३७२
७१.	प्रा. सुनिल भालेराव पाटील	सरदार सरोवर प्रकल्पामुळे विस्थापितांबाबत नर्मदा बचाव आंदोलनाची भूमिका विशेष संदर्भ : नवनिर्माणाचा कार्यक्रम	३७५
७२.	भाऊसाहेब शिवाजीराव उमाटे	हैदराबाद मुक्तिसंग्रामातील जालियानवाला बाग गोटा हत्याकांड	३८०
७३.	प्रा. गावीत यशवंत चेमा	पश्चिम खानदेशातील भिल्ल सेवक 'जयंतराव नटावदकर', कार्य कर्तुत्व - एक अभ्यास	३८६
७४.	प्रा.धनवे एच.डब्लू	मराठवाडा मुक्तीसंग्रामातील रेडिओ केंद्राचे योगदान	३९०
७५.	प्रा. किशोर शेषराव चौरे	मराठवाडा मुक्तिसंग्राम : एक न्यायिक लढा	३९४
७६.	डॉ.अनिता व्यंकटराव शिंदे	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन- एक नवा दृष्टीक्षेप	३९९
७७.	डॉ.सोमनाथ दत्तात्रय कदम	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ आणि मराठा समाजाचा सहभाग विशेष संदर्भ – रत्नागिरी जिल्हा १९३० ते १९४०	४०३
७८.	डॉ. माणिक पोपट पाटील	१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात साप्ताहिक मातृभूमि या मराठी वर्तमानपत्राचे योगदान	४१०
७९.	प्रा.डॉ.गाढवे किशोर गुलाब	एन्. रॉन विरोधी लढा आणि प्रा.डॉ.एन.डी.पाटील	४१५
८०.	कदम अंगध आत्माराम	भारतातील महिला शिक्षणाचा इतिहास	४२०
८१.	डॉ. गंगणे आर.व्ही.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्र अंतर्गत उस्मानाबाद जिल्हयातील स्त्रीयाचे सामाजिक कार्ये (१९५८ ते २०१०)(विशेष संदर्भ : सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक कार्ये)	४२६
८२.	लेफ्ट. डॉ. अर्चना टाक	अहमदनगर एज्युकेशन सोसायटी : महाराष्ट्रातील बालवीर चळवळीची प्रणेती	४३०
८३.	प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम	नवभारत मासिकातील भारतीय परराष्ट्र धोरण विषयक विचार	४३४
८४.	राजश्री गुणाजीराव भोपाळे	हैदराबाद संस्थानातील ऑपरेशन उमरी बँक	४४०

८५.	महानवर राजेंद्र भिकू	राजश्री शाहू महाराज यांचे मानवतावादी कार्य	४४१
८६.	डॉ. संजय जिभाऊ पाटील, वर्षा नारायण पवार	इ.स.१८७६-७७ चा दुष्काळ आणि कसमादे परिसर	४५०
८७.	अर्चना धनवे	जागतिकीकरण व दलित समाज	४५५
८८.	उज्वला वाल्मीक नगराळे	आधुनिक भारताच्या इतिहासातील आदर्श राज्यकर्ती राजमाता अहिल्याबाई होळकर	४६३
८९.	श्री. विजय अशोक गवळी	'भारतीय स्वतंत्रता' तथा 'मराठवाडा मुक्ति संग्राम' के दौर के हिंदी साहित्य में राष्ट्रीय चेतना	४६८
९०.	डॉ. मुबारक कुरैशी	हिन्दी पत्रकारिता में मुखरित महात्मा गांधी का असहयोग आंदोलन	४७७
९१.	डॉ. संजय तोंडारकर	हैद्राबाद स्वाधीनता संग्राम के फिल्ड मार्शल : स्वामी स्वातंत्रतानंद सरस्वती	४८२
92.	Prof. Dr. Rajkumar S. Kamble	Contribution of Arya Samaj In Hydrabad Liberation Movement	४८७
93.	Dr. Prakash Ratanlal Rodiya	History of Indian Economy	४९०
94.	Asst. Prof. Dr. Nita Rameshwar Kalaskar	The study of Ganapati Festival as a revolutionary movement and the Great "Bhausaheb Rangari"	४९३
95.	Prof. Punam. B. Deore, Dr.Amol P. Patil	Geographical Factors and Their Impact on Historical Events	४९९

ISSN No. 2231-4342

८३.

नवभारत मासिकातील भारतीय परराष्ट्र धोरण विषयक विचार

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग
बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव,
तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे.

प्रास्ताविक –

जे प्रकाशन एकाच शीर्षकाखाली किमान एक आठवड्याच्या किंवा त्याहून अधिक कालावधीने सामान्यत: नियमितपणे प्रसिद्ध होते आणि ज्यात अनेक लेखकांचे विविध विषयांवरचे साहित्य संकलित केलेले असते ते नियतकालिक, अशी सर्वसाधारणपणे नियतकालिकांची व्याख्या करता येते. किंवा वृत्तपत्राप्रमाणे बातम्या न पुरविता मनोरंजक व ज्ञानवर्धक मजकूर जी प्रकाशने नियमित कालावधीने पुरवितात त्यांना नियतकालिक अशी संज्ञा आहे. १९व्या शतकात महाराष्ट्रात जी सर्व संग्राहक स्वरूपाची नियतकालिके उदयास आली, त्यातील एक महत्त्वाचे नियतकालिक म्हणजे 'नवभारत' मासिक होय.'नवभारत' मसिकातून राजकीय योगदानाच्या अनुषंगाने भारतीय परराष्ट्र धोरण विषयक प्रसिद्ध झालेल्या लेखांचे चिकित्सक विवेचन प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून केलेले आहे.

'नवभारत' मासिकाची ऐतिहासिक पार्श्वभूमी –

आधुनिक महाराष्ट्रातील नियतकालिक चळवळीतील सर्व संग्राहक स्वरूपाचे व चिकित्सा प्रधान वैचारिक मासिक म्हणजे 'नवभारत' मासिक होय. शंकरराव देव यांच्या संचालकत्वाखाली पुणे येथे २ ऑक्टोबर १९३७ साली 'नवभारत' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आणि महाराष्ट्राच्या जीवनातील सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांची मोकळेपणाने चर्चा करणारे वैचारिक व्यासपीठ मराठी विचारवंतांना आणि अभ्यासकांना उपलब्ध करून द्यावे ही 'नवभारत' मासिक सुरू करण्यामागील त्यांची कल्पना होती.

१९५६ पर्यंत शंकराव देव 'नवभारत' मासिकाचे संचालक होते. पुढे १९५७ साली शंकरराव देव यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळांनी 'नवभारत' मासिक चालवायला घ्यावे, अशी विनंती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना केली. त्यांनी ती विनंती मान्य करून संपादकत्वाची जबाबदारी रॉयवादी तत्त्ववेत्ते गोवर्धन पारिख यांच्यावर सोपविली. पारिख यांच्या संपादकत्वामुळे 'नवभारत' मासिकाचा वैचारिक दर्जा राखला आणि उंचावला गेला.

शोधनिबंधाची उद्दिष्टे –

१) 'नवभारत' मासिकाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करणे.
२) 'नवभारत' मासिकातील भारतीय परराष्ट्र धोरण विषयक लेखांचे चिकित्सक विश्लेषण करणे.
३) 'नवभारत' मासिकाचे राजकीय योगदान अधोरेखित करणे.

गृहितके –

१) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सर्वसंग्राहक स्वरूपाचे नियतकालिक म्हणजे 'नवभारत' मासिक होय.
२) 'नवभारत' मासिकातून भारतीय परराष्ट्र धोरणासंदर्भात प्रसिद्ध झालेले लेख अभ्यासपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण आहेत.
३) भारतीय परराष्ट्र धोरण विषयक लेखांतून 'नवभारत' मासिकाचे राजकीय योगदान अधोरेखित होते.

संशोधन पद्धती –

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यात प्रचलित असणाऱ्या सर्वच संशोधन पद्धती इतिहास संशोधनास उपयुक्त ठरतात. प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहिती संकलन व विश्लेषणात्मक ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भ साधनांचा मूळ अव्वल स्रोत म्हणून 'नवभारत' मासिकाचे मूळ अंक तसेच दुय्यम साधने अभ्यासण्यात आलेले आहेत.

भारताचे परराष्ट्र धोरण –

भारतीय परराष्ट्रीय धोरणाची पायाभूत तत्वे ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळी बरोबरच विकसित होत गेली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय परराष्ट्रीय धोरणाची जी औपचारिक उद्दिष्टे ठरविण्यात आली, त्यांची बीजे स्वातंत्र्य चळवळीच्या काळातच पेरली गेली होती. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय परराष्ट्र धोरणावर ब्रिटिश परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यामागचे मुख्य कारण म्हणजे सुरुवातीच्या काळात परराष्ट्र धोरण निर्मिती प्रक्रियेमध्ये सहभागी होणारे प्रशासकीय अधिकारी हे ब्रिटिश परंपरेच्या पठडीतून तयार झालेले होते. भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांवर देखील ब्रिटिश उदारमतवादी परंपरेचा जबरदस्त प्रभाव होता.

स्वातंत्र्य पूर्व काळात भारतीय परराष्ट्र धोरणाच्या झालेल्या विकासाची विभागणी १८८५ ते १९२० व १९२० ते १९४७ अशा दोन कालखंडांमध्ये करता येते. भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडणाऱ्या चार प्रमुख विचारधारा म्हणजे महात्मा गांधींचा अहिंसावाद, रवींद्रनाथ टागोर यांचा आंतरराष्ट्रीयवाद, महर्षी अरबिंदो यांचा अध्यात्मवाद, जवाहरलाल नेहरूंचा लोकशाही समाजवाद होय. अलिप्ततावाद हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे अत्यंत महत्त्वाचे तत्व होते. या तत्त्वाचे परराष्ट्र धोरणासंदर्भात महत्त्व विशद करताना इंद्रकुमार गुजराल लिहितात की, The non - alignment movements figures firmly in Indias world view and constitute and important plank in our foreign policy. We remain firmly committed to the philosophy and values of the non - alignment movement.1

नवभारत मासिकातील परराष्ट्र धोरण विषयक विचार –

वरील पार्श्वभूमीवर प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने 'नवभारत' मासिकात प्रा. भा.शं. भणगे यांनी फेब्रुवारी १९५१ च्या अंकात भारताचे परराष्ट्रीय धोरण या शीर्षकाखाली लेख प्रसिद्ध केलेला आहे. लेखकाच्या विवेचनानुसार कोरियाचे युद्ध सुरू झाल्यापासून भारताच्या परराष्ट्र धोरणासंबंधी जोरदार चर्चा होऊ लागली. कोणी ती अमेरिकाधार्जिणी म्हणतो तर कोणी ते रशियाधार्जिणी आहे असे म्हणतो, तर कोणी ते तटस्थतेचे असल्यामुळे पडखाऊ आणि निष्परिणामीही आहे असे म्हणतो. अशा प्रकारे श्री. पंडित नेहरूंच्या धोरणाचा इतर देशांना निश्चित अर्थ लागत नाही. त्याप्रमाणे भारतात देखील नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल विविध मतप्रवाह आढळून येतात याबद्दल आश्चर्य वाटते. श्री नेहरूंनी भारताला ब्रिटिश राजकुलात राहण्यास संमती दिली त्याबद्दल संताप व्यक्त करणारे काही टीकाकारही आढळून येतात. काही टीकाकार त्यांना आंग्ल अमेरिकेशी संघनमत करावयास सुचवीत आहेत. या विधानाचा प्रतिवाद करताना लेखकाने अशी मांडणी केलेली आहे की भारताने अमेरिकेच्या गोटात शिरु नये. कारण भारताचे

केवळ साम्यवादाशी वैर असू नये. किंबहुना कोणत्याही राजकीय तत्त्वज्ञानाशी किंवा पक्षाशी प्रस्थापित सरकारने वैर धरु नये. कारण भारत लोकशाही राज्य आहे. लोकशाही राज्यात कोणत्याही एका पक्षाच्या सरकारला अमरपट्टा नसतो.२ लेखकाच्या मते या संदर्भातील दाखला म्हणजे फाळणीपूर्वी पंडितजींनी तात्पुरत्या सरकारची सूत्रे हाती घेताना मध्यवर्ती विधिमंडळात असे एक भाषण केले. त्यातील परदेशविषयक धोरणाबाबत नेहरूंनी असे सुतोवाच केले की, We propose, as far as possible, to keep away from the power politics of group, aligned against one another which have led in the past two world wars and which may again lead to disaster on an even wider scale. We believe that peace and the freedom are indivisible and denial of freedom any where must endanger freedom else where and lead to conflict and war.3

ऑगस्ट १९५४ च्या अंकात प्रा. नारायण देशपांडे यांनी भारताचे परराष्ट्रीय धोरण या शीर्षकाखाली लेख प्रसिद्ध केलेला आहे. या लेखाच्या अनुषंगाने भारतीय परराष्ट्र धोरणाबद्दल असणारे गैरसमज लेखकाने अधोरेखित केलेले आहे. लेखकाच्या मते भारताच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल गैरसमज निर्माण होण्याचे एक महत्त्वाचे कारण असे की या धोरणाची पार्श्वभूमी व मुख्य उद्दिष्टे यांचा साकल्याने विचार न करता त्या धोरणाच्या एखाद्या विशिष्ट अंगावर अथवा स्वरूपावर लक्ष केंद्रित करून धोरणाबद्दल मत बनविण्यात येते. कोणत्याही गटाशी संलग्न न होण्याचे जे धोरण भारत सरकारने स्वीकारले आहे त्यामुळे भारताचे परराष्ट्रीय धोरण सर्वच अनिश्चित व अधांतरी आहे. असा गैरसमज परदेशी निरीक्षक करून घेतात. या गैरसमजांना प्रत्युत्तर म्हणून लेखकाने भारतीय परराष्ट्रीय धोरणाची अशी मीमांसा केलेली आहे की, भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची विविध सूत्रे भारताच्या परराष्ट्रीय जीवनातून विकसित झालेली आहेत. राष्ट्रीय जीवनावर परिणाम करणाऱ्या शक्तींमध्ये देशाची भौगोलिक स्थिती, अर्थव्यवस्था, सामाजिक व वैचारिक परंपरा, राजकीय आदर्श, ऐतिहासिक घटनांमधून निर्माण झालेली मूल्ये, इ.चा समावेश होतो. यांच्या परिणामातून बनलेल्या परराष्ट्रीय धोरणामध्ये एक प्रकारचे सातत्य आढळणे स्वाभाविक आहे. राष्ट्रीय जीवनाच्या गरजांना परराष्ट्रीय धोरण सुसंवादी असणे आवश्यक आहे. त्यानुसार भारताचे परराष्ट्रीय धोरण या देशाच्या राष्ट्रीय जीवनातून विकसित झालेले असून ते त्या जीवनाशी पूर्णपणे सुसंवादी आहे. याशिवाय स्वातंत्र्य संपादनापूर्वी भारतीयांच्या भूमिकेची निदर्शक अशी जी धोरणे वेळोवेळी व्यक्त होत गेली तीच आजच्या स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची मुख्य सूत्रे बनली आहेत. या दृष्टीने भारताचे परराष्ट्रीय धोरण भारतीयांच्याच अनुभवातून विकसित झालेले आहे.

लेखकाच्या मते भारताच्या परराष्ट्र धोरणावर असा एक नेहमी आक्षेप घेतला जातो की, हे धोरण ध्येयवादी आहे पण वास्तववादी नाही आणि त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये हे धोरण प्रभावी ठरणार नाही. परंतु या आक्षेपाचे खंडन करताना लेखकाने अशी मांडणी केलेली आहे की, भारताच्या धोरणामध्ये ध्येयवाद व वास्तववाद यांची सांगड घातली गेली आहे. यासंदर्भात पंडित नेहरूंनी प्रांतिक काँग्रेस समित्यांच्या अध्यक्षांना पाठविलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, धोरणामध्ये ध्येयवाद नसेल तर ते संधीसाधूपणाचे ठरेल आणि धोरण वास्तववादी नसेल तर ते अगदीच निष्प्रभ होईल.४

श्री ना.य.डोळे यांनी श्री. नेहरू व भारताचे परराष्ट्रीय धोरण या शीर्षकाखाली 'नवभारत' मासिकाच्या सप्टेंबर १९५४ च्या अंकात लेख प्रसिद्ध केलेला आहे. त्यांच्या मते, 'नवभारत' मासिकाच्या ऑगस्ट १९५४ च्या अंकात डॉ. देशपांडे यांनी भारताचे परराष्ट्रीय धोरण हा जो उत्कृष्ट लेख लिहिलेला आहे, तो परराष्ट्रीय धोरणावरील महत्त्वाच्या आधारभूत लेखांच्या यादीत समाविष्ट करण्याइतका विवेचनपूर्ण झाला आहे. आपल्या लेखात भारताच्या परराष्ट्रीय

घेण्याच्या कार्यक्रमाची जबाबदारी नेहरू या व्यक्तीवर पडली आहे, या प्रश्नात त्या देशात त्यांनी दाखवलेले धाडस व दिलेली भूमिका सांगण्यासारखी आहे.'५

भारतीय परराष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने सखाराम गणेश देउस्कर (इ.स. १९०८) यांनी 'भारताचे परराष्ट्रीय धोरण – एक दृष्टिक्षेप' या लेखामध्ये विशेष उल्लेख केलेला दिसून येतो. प्रस्तुत लेखात श्री. शंकरराव देव यांनी भारतीय परराष्ट्रीय धोरणासंदर्भात श्री. सखाराम देउस्कर व श्री. न. र. फाटक यांच्या मतांचे विश्लेषण करीत पुढीलप्रमाणे भाष्य केलेले आहे. पंडित जवाहरलाल नेहरू हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्रणेते, शिल्पकार की निर्माणकर्ते या बाबत स्वतःचे मत प्रतिपादन करताना लेखकाने या संदर्भात स्पष्टीकरण करणारे काही मुद्दे तेथे असे अधोरेखित केलेले आहे. त्यानुसार लेखकाच्या निरीक्षणानुसार काही – एक – गट वाटाघाटी संपल्यावर भारताचे पंतप्रधान व कॉमनवेल्थ संबंधाचे मंत्री हे भारत सरकार प्रतिनिधित्व करणारे एक पत्र पंडितजींनी प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांना लिहिले.

या पत्रात भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप व त्याची कार्यपद्धती यावर भाष्य करताना पंडितजी लिहितात, युद्ध टाळणे व जगात शांतता स्थापन करणे हे परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट ठरवले आहे. आपल्या प्राचीन इतिहासातून व नजीकच्या भूतकाळातून सर्वांच्या आपले राष्ट्रीय आंदोलन व वैशिष्ट्ये यांचा आपण अभ्यास केला आहे असे निरनिराळे आदर्श यातून आपले परराष्ट्रीय धोरण ठरवले आहे, प्रत्येक देशाचे परराष्ट्र धोरण त्याच्या आर्थिक धोरणाचा परिपाक असतो.६ म्हणून पंडितजी या धोरणाचे वर्णन अहिंसात्मक असे आहे असे म्हणणे श्री.शंकरराव देव यांच्या मते अधिक यथार्थ होईल. या संदर्भात परराष्ट्र धोरणासंदर्भातील गैरसमजाची कारणेही लेखकाने अधोरेखित केलेली आहेत.

ऑक्टोबर १९६१ च्या अंकात प्रा. ना.ग. डोळे यांनी 'परराष्ट्र धोरणासंबंधी काही शंका' या शीर्षकाखाली नवभारत मासिकात लेख प्रसिद्ध केलेला आहे. प्रस्तुत लेखात अंतर्गत धोरण व देशाचे परराष्ट्र धोरण यांचा अन्योन्यसंबंध काय आहे याबाबत लेखकाने विचार मांडलेले आहेत. देशाच्या परराष्ट्र धोरणाबद्दल आक्षेप व्यक्त करताना लेखकाने अशी मांडणी केलेली आहे की, आपण असे मानतो की देशाचे परराष्ट्र धोरण जनता निश्चित करते, त्यावर नियंत्रण ठेवते व त्यावर देखरेख करते हे खरे आहे का? याबाबत विचार केला असता असे दिसून येते की, १९व्या शतकात असे नव्हते. याबाबत पुष्टी देताना ते असे नमूद करतात की, सम्राट राजा किंवा अध्यक्ष यांच्या हातात त्यावेळी सर्व धोरण असे. परराष्ट्रमंत्री जनतेचा प्रतिनिधी नसून राजाचा नोकर असे. घडलेल्या सर्व घटना घडत व विश्वासू, नम्र व मूर्ख अशा जनतेच्या डोक्यावर त्या आदळल्या जात. वृत्तपत्रे कधी टीका करीत पण बहुदा त्या सर्व घटनांचे स्वागत केले जाई व होऊन गेलेली गोष्ट यातूनही काहीतरी चांगले शोधण्याचा प्रयत्न होई.७

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने 'नवभारत' मासिकात डॉ. ना.ग. डोळे यांनी 'गोवा मुक्ती व भारताचे परराष्ट्रीय धोरण' या शीर्षकाखाली फेब्रुवारी १९६२ च्या अंकात लेख प्रसिद्ध करत असताना भारतीय परराष्ट्रीय धोरणासंबंधी आक्षेप व्यक्त केलेले दिसून येतात. यासंदर्भात मांडणी करताना ते असे निरीक्षितात की, गोवा प्रश्नाच्या सुटकेसाठी १४ वर्षे वाट पाहून आणि शांतता वाटाघाटीचे सर्व उपाय संपुष्टात आल्यानंतर भारत सरकारने सामर्थ्याच्या बळावर गोव्याची मुक्तता केली. या कारवाईमुळे जो 'नैतिक आवाज' आपण कमावला होता तो नाहीसा होतो की काय असा संभ्रम निर्माण झाला आहे. शांतीदूत म्हणून ज्या नेहरूंचा सर्वत्र गौरव झाला त्यांच्यावरच आता इंग्लंडमधील इकॉनॉमिस्ट सारखी जबाबदार पत्रे 'अधःपतीत देवता' अशी टीका करू लागली आहे. अमेरिकेमध्येही सामर्थ्य वापरून गोवा मुक्तीचा प्रश्न सोडविण्याच्या आपल्या निर्णयाचा कडक निषेध होत आहे.

भारत सरकारच्या गोवा मुक्तीच्या कारवाई संदर्भात आक्षेप व्यक्त करताना अमेरिकेचे युनो मधील वकील स्टीफन्सन म्हणाले की, ज्या नेहरुंनी १९६२ हे आंतरराष्ट्रीय सहकार्य वर्ष जाहीर व्हावे व त्या वर्षभर सहकार्यासाठी आटोकाट प्रयत्न व्हावे अशी मागणी केली, त्याच नेहरूंनी गोव्यावर सैन्य धाडून युनोच्या घरघरीला प्रारंभ करून दिला आहे.८ ब्रिटिश सरकार व पाश्चात्य गटातील राष्ट्रांनीही भारताच्या या कृतीचा निषेध केला आहे. लेखकाच्या मते याचे कारण असे की, आपल्या धोरणाबद्दल, भूमिकेसंबंधी आपण जागतिक क्षेत्रात भलतीच प्रतिमा निर्माण करून ठेवली व तीच आपल्या अंगाशी आली आहे. यासंदर्भात समर्थन करताना लेखकाने अशी मांडणी केलेली आहे की आपल्या नैतिक प्रतिष्ठेच्या जाळ्यात आपले सरकारही इतके गुरफटले आहे की, गोवा मुक्त करताना त्याचे समर्थन करण्याचे अनावश्यक केविलवाणे प्रयत्न सतत चालू होते.

नवभारत मासिकात एप्रिल १९६२ च्या अंकात भारतीय परराष्ट्र धोरणासंदर्भात डॉ. ना. य. डोळे यांनी 'भारताचे परराष्ट्र धोरण – देशाचे, काँग्रेसचे, की नेहरूंचे? या शीर्षकाखाली लेख प्रसिद्ध केलेला दिसून येतो. प्रस्तुत लेखात डॉ. ना.य.डोळे यांनी असे अधोरेखित केलेले आहे की, नुकत्याच झालेल्या उत्तर मुंबई मतदारसंघातील निवडणुकीत मेनन यांचा पराभव हा म्हणजे पंडित नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणावर जनतेने अविश्वास दाखविणे होय. असा प्रचार मुद्दाम करण्यात आला. याशिवाय, परराष्ट्रीय धोरण ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे यामध्ये श्री.कृष्णमेनन यांचा वाटा नेहरूंपेक्षाही अधिक आहे असे भासविण्यात आले. याउलट धोरणासंबंधी सर्व मंत्रिमंडळ सामुदायिकरित्या जबाबदार आहे. मेनन ही व्यक्ती नव्हे असा प्रचार करण्यात आला. तसेच परराष्ट्रीय धोरणातील दोष व चुकांबाबत मेनन यांना जबाबदार ठरू नये असे पंतप्रधानांनीही सांगितले.

यावेळी मेनन मुंबईत निवडून आले तरच नेहरूंचे परराष्ट्रीय धोरण सर्व देशाला मान्य आहे हे सिद्ध होईल अशी काही प्रचारकांची भूमिका होती. मात्र मेनन यांची व्यक्तीशः अशी भूमिका असल्याचे दिसून येत नाही. माझा पराभव म्हणजे भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा पराभव असे ते एकदाही म्हणाले नाहीत. उलट त्यांच्या विजयाबद्दल भरविण्यात आलेल्या मुंबईच्या सभेत ते म्हणाले की, सत्ता गटापासून दूर राहण्याचे धोरण हे देशाच्या इतिहासाने, सध्याच्या परिस्थितीने आणि जागतिक राजकारणातील भारताच्या स्थानाने ठरविले आहे. जगात शांतता राखणे हे भारताचे धोरण आहे आणि भारताला याशिवाय दुसरे कोणते धोरण ठरविता येणे शक्य नाही.९ लेखकाच्या विवेचनानुसार नवभारत मासिकाच्या ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर १९५४ या तीन अंकात याबद्दल एकदा चर्चा होऊन गेली आहे. पण मुंबईच्या निवडणुकीमुळे पुन्हा या प्रश्नाला चालना मिळाली आहे.

भारतीय परराष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने नवभारत मासिकात नोव्हेंबर, डिसेंबर१९६४ च्या अंकात प्रा. एम. के. हाल्दर यांनी नोव्हेंबर डिसेंबरच्या अंकात 'नेहरुंचे परराष्ट्रीय धोरण' या शीर्षकाखाली लेख प्रसिद्ध केलेला आहे. भारताचे परराष्ट्रीय धोरण म्हणजे नेहरूंचे परराष्ट्रीय धोरण होय. या परिप्रेक्ष्यातून त्यांनी प्रस्तुत लेखाची मांडणी केलेली पहावयास मिळते. ७ सप्टेंबर १९४७ रोजी आकाशवाणीवरून भाषण करताना ते म्हणाले की, एकमेकांच्या विरोधी प्रयत्न करणाऱ्या सत्तास्पर्धेवर आधारलेल्या गटापासून शक्य तितके दूर राहण्याचा भारत प्रयत्न करील. तरीही असे दिसते की, नेहरूंना आपल्या धोरणाची स्वच्छ दिशा ४ डिसेंबर १९४७ च्या सुमारास दिसली असावी.१० या संदर्भात २५ मार्च १९४७ रोजी आशियातील संबंधांची निश्चिती करणारी परिषद भरविली असता त्या परिषदेत नेहरू म्हणाले की, राष्ट्रे स्वतंत्र झाल्याखेरीज आणि प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य, सुरक्षितता व उत्कर्षाची समान संधी मिळाल्याखेरीज खरी शांतता अस्तित्वात येणार नाही. अनेक अडथळे असले तरी आता जगाची अशी एक अवस्था तयार झाली आहे की, सर्व जगाच्या एकात्मतेसंबंधीचे ध्येय आणि सर्व देशाच्या एकत्रित येण्यातून निर्माण होणारी एखादी कारभार

पाहणारी संघटना या गोष्टी आवश्यकच होणार आहेत. आपण कोणत्याही एका सत्ता स्पर्धेतील गटासाठी झटण्यापेक्षा या ध्येयाच्या दृष्टीनेच कृती केली पाहिजे. ११

निष्कर्ष –

१) स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील समस्यांची मोकळेपणाने चर्चा करणारे वैचारिक व्यासपीठ मराठी विचारवंत, अभ्यासकांना नवभारत मासिकाच्या माध्यमातून उपलब्ध झाले.

२) कोणत्याही एका विशिष्ट विचार प्रणालीचा पुरस्कार करणे हे नवभारत मासिकाचे उद्दिष्ट नव्हते.

३) सर्व भिन्न वैचारिक दृष्टिकोनांना नवभारत मासिकात प्रतिनिधित्व मिळाले.

४) तत्कालिन कालखंडातील महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडींचे प्रतिबिंब 'नवभारत' मासिकात पहावयास मिळते.

५) नवभारत मासिकातून भारतीय परराष्ट्र धोरण विषयक प्रसिध्द झालेले लेख संदर्भमूल्य असलेले दिसून येतात.

६) 'नवभारत' मासिकातून प्रसिद्ध झालेल्या भारतीय परराष्ट्र धोरणावर आधारित लेखांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समर्थनार्थ तर काही विचारवंतांनी परमत खंडन करण्यासाठी हे लेख प्रसिद्ध केलेले दिसून येतात.

७) 'नवभारत' मासिकातून प्रसिद्ध झालेल्या भारताच्या परराष्ट्र धोरण विषयक लेखातून भारताच्या परराष्ट्र धोरणावर घेतलेल्या शंका, गैरसमज काही विचारवंतांनी दूर केलेले आहेत.

अशा प्रकारे 'नवभारत' मासिकाचे आधुनिक भारताच्या इतिहासातील राजकीय योगदान अधोरेखित होते.

संदर्भ टिपा

१) शैलेंद्र देवळाणकर, 'भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर' प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००७, पृ.२६.

२) भा. शं. भणगे, 'भारताचे परराष्ट्रीय धोरण', शं. द. जावडेकर व इतर (संपा.), 'नवभारत', सुलभ मुद्रणालय, पुणे, वर्ष – ४, अंक – ५, फेब्रुवारी १९५१, पृ. ३५.

३) तत्रैव, पृ.३६.

४) नारायण देशपांडे, 'भारताचे परराष्ट्रीय धोरण', शं.द. जावडेकर व इतर (संपा.), 'नवभारत', सुलभ मुद्रणालय, पुणे, वर्ष – ७, अंक – ११, ऑगस्ट १९५४, पृ.४६.

५. ना.य. डोळे, 'श्री. नेहरू व भारताचे परराष्ट्रीय धोरण', शं.द. जावडेकर व इतर (संपा.), 'नवभारत', सुलभ मुद्रणालय, पुणे, वर्ष – ७, अंक – १२, सप्टेंबर १९५४, पृ.४०.

६) शंकरराव देव, 'भारताचे परराष्ट्रीय धोरण – एक दृष्टिकोन', शं. द. जावडेकर व इतर (संपा.), 'नवभारत' सुलभ मुद्रणालय, पुणे, वर्ष ८,अंक – ३. डिसेंबर १९५४,पृ. १ ते १७.

७) ना.य. डोळे, 'परराष्ट्रीय धोरणासंबंधी काही शंका', स.ज. भागवत व इतर (संपा.), 'नवभारत' दी प्राज्ञ प्रेस वाई, वर्ष – १५, अंक – १, ऑक्टोबर १९६१ पृ.५४.

८) ना.य. डोळे, 'गोवा मुक्ती व भारताचे परराष्ट्रीय धोरण', स.ज. भागवत व इतर (संपा.), 'नवभारत' दी प्राज्ञ प्रेस वाई, वर्ष – १५, अंक – ५, फेब्रुवारी १९६२, पृ.१५.

९) ना.य. डोळे, 'भारताचे परराष्ट्रीय धोरण – देशाचे, काँग्रेसचे की नेहरूंचे ?',स.ज. भागवत व इतर (संपा.), 'नवभारत', दी प्राज्ञ प्रेस वाई, वर्ष – १५,अंक – ७, एप्रिल १९६२,पृ. ७.

१०) एम. के. हाल्दर, 'नेहरूंचे परराष्ट्रीय धोरण', वि.म. बेडेकर व इतर (संपा.), 'नवभारत', दी प्राज्ञ प्रेस वाई, वर्ष – १८, अंक – २,३, नोव्हेंबर – डिसेंबर, १९६४, पृ. ७७.

११) तत्रैव, पृ.७७.

* * *